आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३ जुलै २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबईतल्या हाफकिन संस्थेचं खासगीकरण करणार नसल्याचं राज्यसरकारचं विधानसभेत स्पष्टीकरण

- माहिती अधिकार कायद्यातल्या बदलांना स्थगिती देण्याचा राज्य सरकारचा
- निर्णय

- अन्न आणि औषध प्रशासनातर्फे अन्न नमुन्यांच्या तपासणीत गेल्या वर्षभरात चौपट वाढ

आणि

- राज्यात अनेक ठिकाणी संततधार पावसामुळे जनजीवन प्रभावित

**<><><><><>**

मुंबईतल्या हाफकिन संस्थेचं कुठल्याही प्रकारे खासगीकरण करणार नसल्याचं सरकारनं आज विधानसभेत स्पष्ट केलं. कारभार सुधारण्यासाठी या संस्थेची जबाबदारी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे देऊ अशी घोषणा अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली. संस्थेला दीडशे कोटी रुपये देण्याचं आश्वासन तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं होतं. त्या प्रस्तावावर वित्त विभागानं काही त्रुटी काढल्या आहेत. याप्रकरणी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन तोडगा काढू असं झिरवाळ म्हणाले. स्टिंग या एनर्जी ड्रिंकमध्ये काही घातक रसायनं आढळून आली आहेत, जी लहान मुलांसाठी योग्य नाहीत, त्यामुळे शाळेच्या ५०० मीटर परिसरात त्याच्या विक्रीवर बंदी घातली जाईल, अशी घोषणाही झिरवाळ यांनी केली. शाळाशाळांमधून विद्यार्थ्यांचं प्रबोधन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत असंही ते म्हणाले.

भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्देशांचं काटेकोर पालन केलं जाईल. मुंबईत या कुत्र्यांसाठी निवारागृह ६ महिन्यात तयार करू. यासाठी जागा आरक्षित करण्याचा प्रस्ताव महसूल विभागाकडे पाठवल्याचं मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. राज्यात १४ लाख ८० हजाराहून अधिक भटके कुत्रे आहेत. त्यातले

९४ हजार मुंबईत आहेत. राज्यातल्या २ लाखाहून अधिक भटक्या कुत्र्यांचं लसीकरण आणि १ लाख ८० हजाराहून अधिक कुत्र्यांच निर्बीजीकरण झाल्याची माहिती त्यांनी दिली.

मुंबईत मनोरी इथं समुद्राचं खारं पाणी पिण्यायोग्य करण्याचा २० कोटी लीटर क्षमतेचा प्रकल्प उभारण्याचं काम डिसेंबरमध्ये सुरू झालं आहे. ४ वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्याचं नियोजन असून त्यानंतर मुंबईतल्या पाणी पुरवठ्याची समस्या कमी व्हायला मदत होईल असं मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सांगितलं. हा प्रकल्प सुरू झाल्यावर मुंबईकरांकडून १ हजार लिटर मागे ४४ रुपये शुल्क घेतलं जाईल, सध्या हा दर ३५ रुपये असल्याची माहिती त्यांनी दिली. मुंबईची एका दिवसाची पाण्याची गरज ४ हजार ६६५ दशलक्ष लीटर इतकी आहे पण केवळ ४ हजार १०० दशलक्ष लीटर इतका पाणीपुरवठा सुरू असल्याचं त्यांनी उत्तरात सांगितलं. चंद्रपूर-गडचिरोलीत हत्ती आणि मानव संघर्ष तीव्र झाला असून हत्तीच्या हल्ल्यात आतापर्यंत चौघांचा मृत्यू झाला आहे. या घटना थांबवण्यासाठी विशेष टास्क फोर्स स्थापन करण्याची मागणी काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली.

<><><><><>

सन २०२३ ते मे २०२६ या कालावधीत मुंबई शहर आणि उपनगरात रेल्वेशी संबंधित अपघातांमध्ये ५ हजार ९२७ जण मृत्युमुखी पडले, तर रेल्वे प्रवासादरम्यान किरकोळ वादातून १७१ दखलपात्र गुन्हे नोंदवले गेले, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली. जून महिन्यात किरकोळ वादातून २२ वर्षांच्या तरुणाची हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर लोकल रेल्वेच्या सुरक्षेबाबत लक्षवेधी सूचना रवींद्र फाटक यांनी मांडली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून तपास सुरू आहे, असं मुख्यमंत्र्यांनी लेखी निवेदनात सांगितलं. सध्या दररोज ७५ ते ८० लाख प्रवासी लोकलने प्रवास करतात, मुंबई लोहमार्ग आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातल्या १७७ रेल्वे स्थानकांवर ६ हजार ८९९ कॅमेरे कार्यरत आहेत, उपलब्ध मनुष्यबळातून फलाटावर गस्त घालणं, संशयित व्यक्तींची ओळख पटवण्यासाठी विविध तंत्रज्ञानाचा वापर, २४ तास मदत डेस्क, वैद्यकीय मदत खोल्या, तसंच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. प्रत्येक रेल्वे स्थानकात संशयित प्रवाशांच्या बॅगेची तपासणी, तर टर्मिनसवर बॅग स्कॅनरद्वारे तपासणी होत आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी कर्मचारी, 'खाकीतील सखी' अंतर्गत व्हॉटसअ‍ॅप ग्रुप असे उपक्रम

राबवले जात आहेत. मयंक लोहार खून प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकांवर गस्त वाढवण्याच्या आणि प्रवाशांच्या तपासणीची मोहीम आणखी तीव्र करायच्या सूचना दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी निवेदनात सांगितलं आहे.

१ एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या सहा महिन्यांत राज्य महिला आयोगाकडे महिला अत्याचाराच्या १६ हजार ६०८ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी २ हजार ७७७ तक्रारी प्रलंबित आहेत, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत लेखी उत्तराद्वारे दिली. एकंदर तक्रारींपैकी ४ हजार ४९७ तक्रारी या बलात्कार, बालविवाह, हुंडा, लैंगिक भेदभाव, जातीभेद, सायबर गुन्हे अशा सामाजिक समस्यांचा असून यातल्या ७३३ तक्रारी प्रलंबित आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या १७६ पैकी ४८ तक्रारी प्रलंबित आहेत, असंही उत्तरात नमूद आहे.

<><><><>

विविध विद्युत कायद्यानुसार राज्यात पोस्टपेड स्मार्ट मीटर बंधनकारक असल्याची माहिती ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी विधानसभेत दिली. स्मार्ट मीटरमुळे वीज बिल वाढते हा गैरसमज असल्याचं त्या म्हणाल्या. राज्यात आतापर्यंत सुमारे सव्वा कोटी स्मार्ट मीटर लावले आहे. त्यापैकी सुमारे ४ लाख ग्राहकांकडून वीज बिल वाढीच्या तक्रारी आल्या असल्याचं त्या म्हणाल्या. पुण्यात जून अखेर सुमारे ९ लाख ८५ हजार स्मार्ट मीटर लावलेले आहेत. त्यापैकी १ जानेवारी ते २९ मे पर्यंत वीज बिल वाढीच्या पावणे १२ हजार तक्रारी आल्या. यापैकी केवळ ४ तक्रारीत तथ्य आढळल्या, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

राज्यात माहिती अधिकार कायद्यातल्या बदलांना स्थगिती देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे आणि राज्यातल्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी कायद्यातले बदल मागे घेण्याची मागणी केली होती. या मागणीसाठी पाच जुलैपासून आंदोलनाचा इशारा अण्णा हजारे यांनी दिला होता, त्यानंतर काल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या संदर्भात माहिती आयोगाला पत्र पाठवलं.

<><><><>

अन्न आणि औषध प्रशासनानं गेल्या वर्षभरात अन्न नमुन्यांच्या तपासणीत चौपट वाढ नोंदवली आहे. विभागानं आज प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, यावर्षी १ जूनपर्यंत

तपासणीसाठी १३ हजार ४७४ अन्न नमुने प्राप्त झाले असून त्यापैकी ७ हजार ४९४ नमुन्यांची तपासणी पूर्ण झाली आहे. तपासणीनंतर ४ हजार ९१ नमुने निकृष्ट दर्जाचे असल्याचं स्पष्ट झालं. राज्यभरातून गोळा झालेले अन्नाचे नमुने विभागाच्या मुंबई, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या प्रयोगशाळांमध्ये तपासले जातात.

**<><><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी आज जोरदार पाऊस सुरु आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

मुंबई शहर आणि उपनगरात सलग चौथ्या दिवशी पावसाची संततधार सुरू आहे. सकाळपासून जोरदार कोसळणाऱ्या पावसामुळे सखल भागात काही ठिकाणी पाणी साचलं आहे. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर काही ठिकाणी परिणाम झाला आहे.

हवामान विभागानं पुढचे ३ दिवस ऑरेंज अलर्ट जारी केला असल्यानं महापालिकेची यंत्रणा सज्ज आहे. गेल्या २४ तासांत मुंबईतल्या काही भागांत १५० मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे.

**नवी मुंबई** महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं आज दुपारच्या सत्रात सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. पावसामुळे काही ठिकाणी झाडं उन्मळून पडली.

मुसळधार पावसामुळे **रत्नागिरी** जिल्ह्यातल्या सर्वच नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत असून, आज दुपारच्या स्थितीनुसार, खेड तालुक्यातल्या जगबुडी नदीनं भरणे पूल या ठिकाणी इशारा पातळी ओलांडली आहे. पावसामुळे रत्नागिरी-कोल्हापूर महामार्गावर आंबा घाटात आज, तर निवळी घाटात काल दरड कोसळली. गुहागर तालुक्यात अति पावसामुळे झाडं पडून घर आणि मालमत्तेचं नुकसान झालं.

पावसाचं प्रमाण लक्षात घेत **रायगड** जिल्ह्यात महापूर, दरड कोसळणे, यासारख्या नैसर्गिक आपत्तीचा जलद गतीनं सामना करता यावा यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल महाडमध्ये दाखल झालं आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात धरण पाणलोट क्षेत्रात पावसाला दमदार सुरवात झाल्यानं राधानगरी धरणाच्या पाणीपातळीत वाढ होत आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात माओवादविरोधी अभियानात पोलिसांनी बजावलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत गडचिरोली पोलिस दलातल्या पाच सहायक पोलिस निरीक्षकांना वेगवर्धित पदोन्नती देऊन पोलिस निरीक्षक पद देण्यात आलं आहे. मुंबईतल्या पोलिस महासंचालक कार्यालयात आज झालेल्या एका समारंभात पोलिस महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते त्यांना ही पदोन्नती बहाल करण्यात आली.

**// <><><><><>//**